# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १४८ वा ❑ शुक्रवार दि.२५ जुलै २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

# जुनी जखम पुन्हा ताजी झाली!

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

कर्नाटकातील धर्मस्थळ येथील एका प्रसिद्ध धार्मिक संस्थेशी संबंधित धक्कादायक घटनेने संपूर्ण देशात खळबळ उडाली आहे. धर्मस्थळ येथे पूर्वी सफाई कर्मचारी म्हणून काम केलेल्या एका व्यक्तीने दावा केला आहे की, १९९५ ते २०१४ या कालावधीत सुमारे १०० बलात्कार पीडित मुली, महिला आणि पुरुषांचे मृतदेह वेगवेगळ्या ठिकाणी पुरण्यात आले होते. या दाव्याने राज्यात आणि देशभरात मोठी खळबळ उडाली आहे.या दाव्याने जुनी जखम ताजी झाली आहे.प्रश्न हा आहे की सफाई कामगाराने इतके वर्षे ही बाब समोर काआणली नाही? आताच हा प्रकार समोर का आला? तक्रार करणाऱ्याला भीती वाटत होती म्हणून तक्रार केली नसल्याचे त्याचे म्हणणे आहे.या मोठ मोठ्यांचे हात गुंतलेले आहेत...असे तो म्हणतो...आज या व्यक्तीला भीती वाटत नाही का?

सफाई कर्मचाऱ्यानं केलेल्या दाव्यावर विश्वास ठेवता येईल का? असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे. प्रश्न व शंका अनेक आहेत.त्यामुळे सत्य समोर येईल का?

धक्कादायक दावा आणि मॅजिस्ट्रेटसमोर जबाब

बेल्थांगडी न्यायालयामध्ये ११ जुलै रोजी एका व्यक्तीने कडेकोट बंदोबस्तात प्रवेश केला. पूर्णपणे काळ्या कपड्यांमध्ये आलेल्या या व्यक्तीसोबत वकिलांचा मोठा ताफा होता. या सफाई कर्मचाऱ्याने भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या (बीएनएसएस) कलम १८३ अंतर्गत मॅजिस्ट्रेटसमोर जबाब नोंदवला.

या व्यक्तीने आपल्या जबाबात म्हटले आहे की, तो १९९५ ते २०१४ पर्यंत धर्मस्थळ परिसरात सफाई कामगार म्हणून कार्यरत होता. या काळात त्याला अनेक क्रूर हत्यांनंतर मृतदेह दफन करण्यास भाग पाडले गेले. त्याने सांगितले की, पुरलेल्या मृतदेहांमध्ये १२ वर्षांपेक्षा कमी वयाच्या अनेक मुलींचा समावेश होता, ज्यांना शारीरिक आणि मानसिक छळ सोसावा लागला होता.

तसेच, त्याने नग्न अवस्थेतील अनेक महिलांचे मृतदेह पाहिल्याचेही नमूद केले. या दाव्याच्या समर्थनार्थ त्याने फोटो आणि इतर पुरावेही मॅजिस्ट्रेटसमोर सादर केले आहेत.

जीवे मारण्याची धमकी आणि सुरक्षा मागणी

सफाई कर्मचाऱ्याने म्हटले आहे की, १९९८ मध्ये जेव्हा त्याने मृतदेह दफन करण्यास नकार दिला आणि पोलिसांना माहिती देण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने त्याला मारहाण केली आणि जीवे मारण्याची धमकी दिली. यामुळे तो इतकी वर्षे गप्प राहिलो

त्याने आपल्या जबाबात असेही म्हटले आहे की, धर्मस्थळ गावाभोवती अनेक ठिकाणी हे मृतदेह पुरण्यात आले होते, तर काही मृतदेह जाळण्यासाठी डिझेलचा वापरही करण्यात आला होता. यामागे काही 'शक्तिशाली लोक' असल्याचा दावा त्याने केला आहे. जर त्याला पुरेशी सुरक्षा मिळाली, तर तो त्या लोकांची ओळख उघड करेल, असेही त्याने स्पष्ट केले आहे.

कर्नाटक सरकारकडून एसआयटीची स्थापना

या गंभीर प्रकरणामुळे सर्वोच्च न्यायालयातील वरिष्ठ वकिलांच्या एका टीमने तपासावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. यानंतर कर्नाटक सरकारने या प्रकरणाच्या तपासासाठी तातडीने पावले उचलली आहेत. रविवारी (२० जुलै) कर्नाटक सरकारने विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्याची घोषणा केली आहे. या एसआयटीचे नेतृत्व डीजीपी दर्जाचे अधिकारी प्रणब मोहंती करत आहेत.

तक्रारदारानं सांगितलं की तो हा मानसिक दबाव आणखी सहन करू शकला नाही आणि त्याच्या कुटुंबासह राज्याबाहेर निघून गेला. एफआयआरमध्ये लिहिलं आहे, ''ज्या लोकांची नावं मी सांगू इच्छितो, ते धर्मस्थळ मंदिर प्रशासन आणि इतर स्टाफशी संबंधित आहेत. अजून मी त्यांची नावं सांगू शकत नाही, कारण काहीजण खूपच प्रभावशाली आहेत. ते विरोध करणाऱ्यांना संपवू शकतात.'' ''मला आणि माझ्या कुटुंबाला कायद्याअंतर्गत सुरक्षा मिळाली की, मी सर्व नावं आणि त्यांची यातील भूमिका उघड करण्यास तयार आहे.'' तक्रार खरी असल्याचं दाखवण्यासाठी आणि पुरावे सादर करण्यासाठी, सफाई कर्मचाऱ्यानं त्या कबरींपैकी एक कबर खोदली आणि मॅजिस्ट्रेटसमोर जबाब नोंदवताना फोटो आणि पुरावेदेखील दिले. त्याचा हा जबाब भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या (बीएनएसएस) कलम १८३ अंतर्गत नोंदवण्यात आला.

जबाब नोंदवताना तक्रारदार डोक्यापासून पायापर्यंत काळ्या कपड्यांनी झाकलेला होता. त्याच्या डोळ्यांवर देखील पातळ कापड होतं, ज्यामुळे तो फक्त रस्ता पाहू शकत होता






# आषाढी एकादशी निमित्त आयोजीत खुल्या रीले स्केटिंग स्पर्धा उत्साहात संपन्न

ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर –** रोलर रिले स्केटिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र आयोजीत, रोलर रीले स्केटिंग असोसिएशन ऑफ छत्रपती संभाजीनगर संलग्नीत, स्केटिंग फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या मान्यतेने विठ्ठल चषक ४२ व्या खुल्या राज्य रीले स्केटिंग स्पर्धा आषाढी एकादशी निमित्त ६ जुलै रविवार रोजी विभागीय क्रीडा संकुल छत्रपती संभाजीनगर येथे उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत महाराष्ट्रातील कोल्हापूर, सोलापूर, सातारा, चंद्रपूर, धुळे, नंदुरबार, यवतमाळ, पुणे, मुंबई, जळगाव, भुसावळ, नागपूर, अकोला, जालना, बीड, अहमदनगर, बार्शी तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर येथील तब्बल तीनशे स्पर्धकांनी स्पर्धेत सहभाग घेतला. स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा क्रीडा अधिकारी छत्रपती संभाजीनगर बाजीराव देसाई तसेच शिवकला नेत्रालयचे संस्थापक व समाजसेविका डॉ. हिना ठाकूर यांच्या हस्ते पार पडले या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून अ‍ॅड. श्रीकांत वीर (हायकोर्ट वकील), डॉ. उमेश रायते (एम्स हॉस्पीटल) यांनी स्पर्धकांचा उत्साह वाढवत मार्गदर्शन केले. या संपूर्ण स्पर्धा रोलर रिले स्केटिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे संस्थापक सचिव भिकन अंबे यांच्या मार्गदर्शनाअंतर्गत पार पडल्या. तसेच स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा सेवानिवृत्त जिल्हा क्रीडा अधिकारी चंद्रशेखर घुगे, ज्ञानेश्वर दळवी, सुनिता घुगे, राधिका अंबे यांच्या हस्ते पार पडला. स्पर्धेदरम्यान सूत्रसंचालनची भूमिका प्राध्यापक अमृत बिऱ्हाडे यांनी उत्स्फूर्तपणे पार पाडली.

आषाढी एकादशीच्या दिवशी आयोजित स्पर्धेत स्पर्धकांचा व पालकांचा प्रचंड प्रतिसाद व उत्साह संपूर्ण स्पर्धेचे वातावरण दिंडीमय झाले होते. स्पर्धेदरम्यान ऑफिशियल म्हणून छत्रपती संभाजीनगर पूजा अंबे, धुळे धनंजय पाटील, कोल्हापूर स्वरूप पाटील, जळगाव संजय पाटील , वैजापूर शेख मुनावर, जळगाव दीपेश सोनार, साई अंबे, सोलापूर गणेश रोडे, नागपूर रवींद्र मिसाळ, चंद्रपूर रोशनी काटेकर, सोलापूर समाधान चांदणे, यवतमाळ विजय सालोडे या सर्व राज्य रोलर रिले स्केटिंग संघटनेच्या सदस्यांनी पंच व ऑफिशियल म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली.



या स्पर्धेतील विजेते खेळाडू ऑल इंडिया रीले स्केटिंग स्पर्धेसाठी पात्र ठरले व त्यांची शिमला येथे होणाऱ्या स्पर्धेसाठी निवड झाली.

**स्पर्धेचा अंतिम निकाल पुढील प्रमाणे:**

फॅन्सी इनलाईन यु-४ – अविर कावळे, श्रेयस म्हस्के

यु-६- आरव नायर, अव्यांत देशमुख, अंश गाडे

यु-६ – सोजल रणदिवे, नारायण कुलकर्णी

यु-८ –

अंश शेलार, आराध्य दूबे, राजवर्धन सिंह चौहान

यु-८ – मनस्वी मखाने, कनक त्रिवेदी

यु-१० – मानस देऊळगावकर, मनन सेठीया, समर्थ इंगळे

यु-१० – तनया पडवी, निहारिका नैनाव, स्वरा लड्डा

यु-१२ – शर्वरी यादव, कनिका मेथी, श्रेया मस्के

यु-१२ – सुवर्ण सराफ, आर्यन चांदणे,रोमीर देशमुख

यु-१४ – अथर्व चौधरी, अर्णव लंके, निल बागमार

यु-१४ – गौरी जाधव. प्रोफेशनल इनलाईन

यु-६ – ध्रूव जैस्वाल, जय देसाई, हरिओम कानव

यु-८ – युवराज पौंड

यु-१० – रघुवीर महाजन, अगम्य रगडे

यु-१० – राधा चव्हाण, मिष्टी सदानंद

यु-१२ – वीर रोडिया

यु-१४ – निधीश शिरसाट

यु-१४ – इशिका साबळे, खुलागट

यु- भावेश गुरव. कॉड्स स्केट,

यु-४ – रियांश बनसल

यु-४ – वसुधा पाटील

यु-६ – विश्व ढोरे, पार्थ राजपूत, धैर्य देवरे

यु-६- अधिरा राजपूत, मीन्नती सुराणा.

यु-८ – यथार्थ सरुक, दिशांत शिर्के, सौम्यक पाटील

यु-९ – ईशान जावळे, प्रणय माळी, तीर्थराज पाटील

यु-८ – सावली खताळ, चेतना धक्कड, आराध्या पवार

यु-१० –रोनक देवरे, शौर्य तावडे, श्रीराम बोरसे

यु-१० – आराध्या जितेकर, परी सूर्यवंशी, सारा राजपूत

यु-११ –कृष्णा खडसे, भूपेंद्र शार्दुल, प्रभास मिसाळ

यु-१२ – सुवर्ण ढाके, खुश बोडे, मिथिलेश ठाकूर

यु-१२ – रुही मिसाळ, राजली देसाई, सारा बेहरे, शौर्या जाधव.

यु-१३ – यश पाटील,यश हिवारकर, हार्दिक काटेकर.

यु-१४ – लकी पयाघन, चिरायू मेहता, अनुष मारगोलवाल.

यु-१४ – आराध्या पाटील.

यु-१६ – प्रथमेश इंगळे, अवधूत पाठक, वेदांत राजपूत.

यु-१६ – सानवी सोनवणे. खुलागट – अंकुश बनसोड, अनुराग खैरनाल, यश दामधर. खुलागट – दिव्या हंकर

# डॉ. मिलिंद शहा यांना कोलंबो, श्रीलंका येथे मार्गदर्शनासाठी विशेष अतिथी म्हणून आमंत्रित

ज्योतिर्मय साहित्य

**सोलापूर –** दि. २३ जुलै २०२५ ते २५ जुलै २०२५ रोजी कोलंबो, श्रीलंका या देशामध्ये १३८ व्या जागतिक वैद्यकीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेमध्ये उतारवयामध्ये आपल्या शारिरीक व मानसिक आरोग्याची कशी काळजी घ्यावी या विषयावर बोलण्यासाठी डॉ. मिलिंद शहा यांना आमंत्रित करण्यात आलेले आहे. त्याचबरोबर नवजात बालकांची व गर्भावस्थेतील अर्भकाचे मृत्यूचे प्रमाण एकंदरीत दक्षिण आशियायी देशामध्ये कसे कमी करण्यात येईल, यावरही चर्चा होणार आहे. त्यामध्ये डॉ. मिलिंद शहा यांना विशेषरित्या आमंत्रित करण्यात आले आहे. या चर्चेमध्ये जागतिक स्तरावरील वेगवेगळया संस्था भाग घेणार आहेत व चर्चेअंती एक आराखडा तयार करुन त्याचा अवलंब वेगवेगळया देशांमध्ये या बालकांचे मृत्युचे प्रमाण कमी करण्यासाठी कसे वापरण्यात येईल याचा आराखडा तयार करण्यात येणार आहे.



त्यांना स्त्रीरोग शास्त्रावरील विविध विषयावर बोलण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे.

शिवाय पर्यावरण व आरोग्य याची सांगड कशी घालता येईल याबद्दल एक पॉलिसी डॉक्युमेंट (धोरणात्मक नियमावली) तयार करण्यात येणार आहे. हे डॉक्युमेंट तयार करण्याच्या चर्चेमध्येही ते आपला सहभाग नोंदवतील.

डॉ. मिलिंद शहा सोलापूर व मुंबई येथे गेली जवळजवळ तीस वर्षे वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत आहेत. शहरातील विविध रुग्णालयांमध्ये ते आपली सेवा देतात. त्याच बरोबर फॉग्सी, आयसोपार्ब, आय.एम.ए. अशा विविध संस्थांवर अध्यक्ष व विविध पदाधिकारी म्हणून त्यांनी कामे केले आहे. आजवर जवळजवळ तीस देशांमध्ये




## आजपासून नवे सदर...

# वास्तुशास्त्र पेंटिंग्स



**आज आपला 'ज्योतिर्मय साहित्यातील' पहिला लेख. याला आपण लघुलेख असंच म्हणूयात. २०२५च्या श्रावण महिन्याचा आज शुभारंभ !**

या महिन्यात हिन्दु धर्मातील सण-उत्सव यांची मांदियाळी असते. या पवित्र महिन्यात भगवान शंकराची पूजा-आराधना तर करतातच शिवाय नैसर्गिक वातावरणाच्या दृष्टीने या महिन्यापासून सृष्टिसौंदर्यात भर आणि बहार येत असतो.

याच पार्श्वभूमिवर आपण 'वास्तुशास्त्र पेंटींग' या अद्भुत विषयांवर माहिती जाणून घेणार आहोत. हे एक, अचुक असे शास्त्र असून विज्ञान, अध्यात्म, धार्मिक, सामाजिक आणि मानसिक अशा पांच पैलुव्दारे मानवी जीवनावर प्रभाव टाकणारा उच्च उपचार आहे. हा उपचार, आपल्या स्वतःवर आपल्या कुटूंबातील घटकांवर आपल्या नोकरी किंवा व्यवसायावर आपल्या उद्योगधंद्यावर, आपल्या इंडस्ट्री किंवा कंपनीवर अगदी आपल्या जमिन-कृषी व्यवसायावर देखिल 'सकारात्मक' उपाय म्हणून दीर्घ काळ प्रयोग करून, अनेक निरिक्षणे नोंदवून नंतरच निश्चित केला आहे. यासाठी रंगशास्त्रातील 'पिग्मेंट थिअरी' आणि न्युटन ची 'लाईट थिअरी' यांचा सूक्ष्म अभ्यास तर केला आहेच तथापि कुंडली शास्त्र, गृह, नक्षत्र, प्रतिके, चिन्ह, आकार, मंत्र आदि अध्यात्मिक बाबीचाही खोलवर जावून, अभ्यास करून नंतर "वास्तुशास्त्र पेंटिंग" निर्माण झाले आहे, ज्यांचा आपल्या वास्तूत वास सुरु झाला की, आश्चर्यकारकरित्या आपणांस अनुभव यायला सुरुवात होते...!!!


क्रमशः....

## मंत्र पुष्पांजली बद्दल थोडंसं..... (पुढे)

या खाणिनेत्राचा मुलगा आविक्षित प्रजाहित रक्षक राजा होता. या आविक्षिताचा मुलगा मरुत्त.
"आविक्षितस्य कामप्रे" –- मधला हा आविक्षित
"मरुत्तस्यावसनगृहे" –- मधला हा मरुत्त
हा मरुत्त चक्रवर्ती राजा झाला. त्याच्या गौरवासाठी रचली गेलेली ही मंत्रपुष्पांजली होय.
भारतात अनेक चक्रवर्ती राजे झाले मग या मरुत्ताचं वैशिष्ट्य काय ?
त्यानी प्रजेसाठी खूप अडचणींना तोंड देत एक मोठ्ठ यज्ञ केला.
यज्ञ म्हणजे अनेकांच्या भल्यासाठी केलेलं प्रोजेक्ट.

क्रमश: .....

# शुकासारखे पूर्ण वैराग्य




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२


**ज्योतिर्मय साहित्य**

पुढे बारा वर्षे केलेल्या तीर्थयात्रेत त्यांनी जवळपास सर्व देश पायी पालथा घातला. या तीर्थयात्रेत त्यांना आपल्या देशातील लोकांची दशा व दिशा पाहावयास मिळाली. बुडते हे जन न देखावे डोळा अशी त्यांची वृत्ती झाली. त्यांनी पहिले की समाज आत्मकेंद्रित झाला आहे. स्वार्थामुळे लोकांमध्ये संघटन नाही, संघटनेअभावी शक्ती नाही, शक्तीअभावी साहस नाही, साहस नसल्याने प्रतिकार नाही आणि प्रतिकाराअभावी अत्याचार मुकाट्याने सोसण्यास पर्याय नाही. म्हणून त्यांनी दोन आदर्श समाजापुढे ठेवले. पहिला आदर्श श्रीरामाचा. दुष्टांचा निः पात करून सज्जनांचे परित्राण करणारा श्रीराम. आपल्या पराक्रमाने देवांना बंदिवासातून सोडवणारा श्रीराम. आणि या रामरायांचा निष्ठावंत सेवक मारुती. समाजाला बल, बुद्धी, शील आरोग्य प्रदान करण्यासाठी समर्थांनी हेतुपूर्वक हे दोन आदर्श समाजासमोर ठेवले आणि शक्तीच्या उपासनेचे महत्व लोकांना पटवून दिले. त्यासाठी श्रीराम मंदिरांची व मारुतीरायांच्या मंदिरांची गावोगावी स्थापना करविली. भारताच्या अनेक प्रांतातून शेकडो मठ स्थापन केले. हे मठ केवळ अध्यात्मिक उपासना केंद्रे नव्हती तर तेजस्वी संस्कारकेंद्रे देखील होती. या मठातून बल, बुद्धी, शक्ती यांच्या माध्यमातून शिष्यवर्ग घडत होता. समर्थ कार्यात त्यांच्या मठ, मंदिर व महंतांचा मोठा वाट आहे.



समर्थांनी क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे हे लोकाना पटवून दिले. त्यांच्यासारखी लोकांना अध्यात्म व प्रपंच यांची सांगड घालून शिकवण देणारा संत विरळाच. यत्न हाच देव मानावा हे सांगून त्यांनी लोकांना दैववादापासून परावृत्त केले. हे करीत असतानाच त्यांनी ग्रंथराज दासबोधासह विपुल लेखन केले. त्यात मनाचे श्लोक, आत्माराम,करुणाष्टके आदी आहेत. त्यांनी लिहिलेल्या आरत्या आजही म्हटल्या जातात. त्यांचा दासबोध हा ग्रंथ तर विविध विषयांवर केलेले मुक्त चिंतनच आहे. प्रपंच करतानाच परमार्थ कसा साधावा याचे उत्तम मार्गदर्शन या ग्रंथातून समर्थांनी केले आहे.

शुकासारिखे पूर्ण वैराग्य ज्याचे,
वशिष्ठापरी ज्ञान योगेश्वराचे
कवी वालमिकासारिखा मान्य ऐसा,
नमस्कार माझा सद्गुरू रामदासा .



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# शिष्यलक्षण

**ज्योतिर्मय साहित्य**


समर्थ भूमीचे ऊदा या ओवीत देतात. ज्याप्रमाणे खडकाळ जमीनीवर कोणतेही पीक येणार नाही. सद्गुरू हा ऊत्तम बी सारखा असावा. सद्गुरू पूर्ण पणे शिष्याच्या पाठीशी आहे. तो खरा ब्रम्हज्ञानी आहे अत्यंत दयाळु आहे पण त्याला जर शिष्य हा अनाधिकारी,अपात्र,परमार्थ करण्यासाठी लायक भेटला नाही तर सद्गुरूचे श्रम वाया जातात. म्हणजे देणारा भेटला पण घेणाऱ्या ची योग्यता नाही अशी अवस्था होते यालाच देव देतो पण कर्म नेतंअसं म्हणतात म्हणून आयुष्यात चांगली माणसं भेटावीत व आपल्या आयुष्याचं सार्थक करून घ्यावे. त्यामुळे देणारा आनंदी होतो व घेणाराही आनंदी होतो .

परमार्थ जीवनाची अंगे –

जमीन ऊत्तम आहे, बी पण ऊत्तम आहे पण पाऊस पडला नाही तर ते पीकपाणी येत नाही। तसेच सद्गुरू आहे त्याला सतगुणी शिष्य मिळाला आहे पण दोघांमध्ये आत्मज्ञानाबद्दल सुसंवाद नसेल तर शिष्याला स्वानुभव येणार नाही. मंडळी परत आपण शेताचं ऊदा घेऊयात. शेतामध्ये बीं पेरले ते चांगली उगवले पण त्याची योग्य ती निगराणी केली नाही पाखरे गुरेढोरे गिधाड टोळधाड यांनी सर्व पिकाची नासाडी केली . तर नुकसान होते तद्वत सद्गुरूने शिष्याला ऊत्तम बोध केला,शिष्याच्या साधनेत सातत्य नसेल तर सद्गुरूचे श्रम वाया जातात.शिष्याने आत्मज्ञानाचा साक्षात्कार झाला तरी गर्व करू नये. कारण अविद्येचा अंमल चालून ज्ञान मंद होण्याचा संभव असतो म्हणून सद्गुरूच्या ठायी कायम निष्ठा असली पाहिजे. कधीही मलाच काय ते सर्व ज्ञात.आहे व बाकीचे सगळे मूर्ख आहेत या आत्मविश्वासाने राहू नये. गुरूवर श्रद्धा ठेवावी.

***

# सदवस्तू साध्य करून घेण्याचा उपाय सत्संगती.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

**ज्योतिर्मय साहित्य**

एखाद्या दारूबाजाप्रमाणे विषयी मनुष्य वागत असतो. त्याला सर्व कळते, पण वळत नाही. एकीकडे स्वत:ला जो परमात्म्याचा अंश म्हणवितो, आणि दुसरीकडे विषयांच्या आहारी जातो. खरोखर, भक्तीशिवाय सर्व काही वाया आहे. संताजवळ राहावे आणि भक्तीचे साधन करावे. आपल्याला काही करायचे उरले आहे असे जे वाटते, ते न वाटू लागले, म्हणजे साधनात प्रगती झाली असे समजावे. भगवंताची भक्ती घडायला गुरुसेवा हे एक मुख्य साधन आहे. जो शिष्य आज्ञा पाळतो त्याला भेटणे गुरूला भागच पडते. वास्तविक, गुरू मनात काही इच्छाच येऊ देत नाही; म्हणून कामधेनूपेक्षाही गुरू श्रेष्ठ आहे.

अत्यंत तळमळीशिवाय भगवंताचा योग शक्य नाही. संतसमागम प्रारब्धाने होतो, पण 'सम' रीतीने जाता आले तर खरा 'समागम' घडतो. पण आमचा मार्ग विषय आहे; म्हणून संत भेटूनही त्याचा 'समागम' आपल्याला होत नाही. विषयांमध्ये धुंद असलेल्या आम्हांला पाहून संतांच्या मनात कालवाकालव होते; त्याची आपल्याला कल्पनाही येणार नाही. आपली बुद्धी आपल्याला समाधानाप्रत नेत नाही, तर दुसऱ्याची मदत घेणे आवश्यक आहे. अशा वेळी, ज्यांची मदत आपण घेतो त्यांचे आपण ऐकायला नको का ? भगवंताच्या जिज्ञासेचा मार्ग आक्रमायला संतांनी सांगितले. संतांना जिज्ञासा मूळचीच असते. आपल्याला ती नाही, म्हणून ती उत्पन्न करणे भाग आहे. काही केल्याशिवायच सद्वस्तू साध्य करून घेण्याचा उपाय, म्हणजे सत्संगती हा होय. सत्संगती अती अपूर्व काम करणारी आहे. ज्याचे भाग्य थोर असेल त्यालाच ती लाभेल. एखादा मनुष्य भोवऱ्यात सापडला तर त्याला बाहेर काढण्याचे दोन मार्ग आहेत. एक मार्ग असा की, दुसऱ्या चांगल्या पोहणाऱ्याने त्या भोवऱ्यामध्ये उडी मारून तो फोडायचा आणि बुडत्याला बाहेर ओढून काढायचे. पण यासाठी शक्ती फार लागते. दुसरा मार्ग असा की, आपणच भोवऱ्यामध्ये बुडी मारून तळाशी जायचे आणि खालून बाहेर निघायचे. विद्वत्ता ही भोवऱ्यासारखी आहे. वर वर पाणी फिरत असते तरी तळाशी ते संथ असते. तसे, जे लोक वरवर विद्या शिकतात ते वादाच्या आणि मतांतराच्या चक्रात सापडतात; पण जे खोल तळाशी जातात त्यांना खरे काय ते आपोआप कळते, आणि ते सगळीकडे एकच असते. विद्येच्या भोवऱ्यामध्ये सापडणाऱ्यांना बाहेर ओढून काढण्याचे काम फार मोठ्या संतांचे असते. शहाण्याने त्या भानगडीत न पडावे. हजारो लोक भगवंताच्या नामाला लावणे हे खरे संतांचे काम होय.

कोणत्याही सत्पुरुषाची परंपरा रक्षण केली पाहिजे. त्यात आपले घुसडू नये.

## ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

### संत ज्ञानेश्वर महाराज यांचा अभंग

**ज्योतिर्मय साहित्य**

ही अशी अज्ञानात असणारी व रोज प्रसवूनही रोज वांझ ठरणारी गाय कोणती हे तुम्ही सद्गुरूंना विचारा. कारण त्यांच्या चैतन्य मयी स्पर्शा शिवाय मन ब्रह्म स्थानात लीन होणार नाही. म्हणजेच मनाची उत्तम अवस्था प्राप्त होणार नाही. असे संकेत मनासाठी ज्ञानेश्वर माऊलींनी इथे दिले आहेत.

मनाच्या चंचल ते विषयी तुकाराम महाराज म्हणतात
मन माझे चपळ न राहे निश्चळ
घडी एकी पळ स्थिर नाही
आता तू उदास नव्हे नारायणा
धावे मजदिना गांजियले
धाव घाली पुढे इंद्रियाचे ओढी
केले तडातडी चीत माझे

विषयाकडे वळलेले मन आपणास कसे गांजून टाकते हे आपणास यातून कळते.

मनाविषयी निळोबा राय काय म्हणतात ते आता आपण पाहू
मन विश्रांती पावले
गुरु चरणी स्थिरावले
ज्ञानयुक्त होता मन
ब्रह्मभूत झाले जान
जिकडे जिकडे जाय मन
तिकडे तिकडे अधिष्ठान
निळा म्हणे मन
होऊनी ठेले उन्मन

इथेही आपणास विषयाकडे वळलेले मन दुःख देणारे तर ब्रह्मरूप झालेले मन हे सुख देणारे, महानंद देणारे व उन्मनी अवस्थेत गेलेले दिसून येते.

तुकाराम महाराज एका अभंगात म्हणतात
नको नको मना गुंतू माया जाळी
काळ आला जवळी ग्रासावया
काळाचीए उडी पडेल बा जेव्हा
सोडविना तेव्हा मायबाप

विषयात अडकलेले मन हे माया जाळात अडकलेले आहे तिथे त्याला गुंतू देऊ नकोस तर ते ब्रह्मरूप कर आत्म्याकडे वळव कारण केव्हाही काळ ग्रासेल असेच तुकाराम महाराज सांगतात.

समर्थ रामदास स्वामी मनाविषयी काय म्हणतात तेही आपण पाहू
मना पाप संकल्प सोडून द्यावा
मना सत्य संकल्प जीवि धरावा
मना कल्पना ते नको विषयाची
विकारी घडे हो जनी सर्व ची ची

विषयात अडकलेले मन हे पाप संकल्प करणारे असते तर सत्य संकल्प हा केवळ आत्म्यात लीन होणारे मनच करू शकते. ते करावे. मनात विषयांची कल्पना करू नये. कारण त्यामुळे विकार ग्रस्त मन होते. असेच रामदास स्वामी हे सांगतात.

संत कबीर म्हणतात कबीरा मन निर्मल करे जैसे गंगाका नीर पाछे पाछे हरी फिरे कहत कबीर कबीर मनातील विकारांचा मळ काढून मन हे गंगेच्या पाण्या सारखे निर्मळ करायला हवे. त्यासाठीची साधना करायला हवी. असे केले तर तुम्हाला परमेश्वराच्या पाठीमागे लागण्याची गरज नाही, तर उलट तोच तुमच्या पाठीमागे लागेल. असे कबीर म्हणतात.

आपले मन स्वाभाविकपणे विषयाकडे वळलेले असते. यात सतत नवनवीन कल्पना चे उन्मेश भरून येतात. इच्छा आकांक्षा जन्म घेतात व म्हणूनच असे मन हे अल्पजीवी सुख व दीर्घकाळ दुःख देणारेच ठरते या अल्पजीवी सुखाकडून शाश्वत सुखाकडे जायचे असेल तर मनाचा फेर उलट करून आत्म्याकडे वळवावा लागेल. आणि यासाठी सद्गुरुला शरण जाऊन त्यांच्या सानिध्यात कठोर साधना ही करावी लागेल. अशी साधना आपण करावी असेच संकेत ज्ञानेश्वर माऊली या अभंगातून आपणास देत आहेत.

जीवनाचे ध्येयच मुळी दुःखाची निवृत्ती व सुखाचा शाश्वत लाभ हेच आहे दुःखाचा त्याग होऊन सुखाचा लाभ कसा मिळावा याचा मूलमंत्र देणाऱ्या महान मानसोपचार तज्ञ संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या चरणावर विनम्र भावाने प्रणिपात करून हा भाग इथे संपवूया

निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई एकनाथ नामदेव तुकाराम
जय हरी माऊली

## ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**

३. श्रीगुरुवंशवंदना

योगानंद स्वामी, शाक्तपंथी थोर।
तेचि मिटवीती, संसाराचे घोर।।
भगवानशास्त्री, तयांचे अवतार।
सकल जनांचा, करिती उद्धार।।
चन्द्रहास म्हणे, पुण्य हे अपार।
श्रीगुरू सांगती, निर्गुणाचे सार।।

४. अंबानाम–महात्म्य

नाव घेता रेणुकेचे। पापे जळती रे सारे।
थांबवोनी चित्तवृत्ती। मोक्ष उघडितो दारे।।
रहावे रे गुण्यागोविंदे। न करावे आरे कारे।
नाही कधी रे शमते। वैराच्या साधने वैरे।।
ऋद्धी सिद्धी अंबा नामे। मंत्र एक मनी धरे।
चन्द्रहास म्हणे माये। चारा भरवी पाखरे।।




# आपल्या शरीराचे वजन प्रमाणातच हवे म्हणजे किती.....?

**ज्योतिर्मय साहित्य**

आपल्याला वाटते, वाढत्या वयानुसार आपले वजन योग्य आहे, पण खरे तर विसाव्या वर्षीचे वजन हेच आपले योग्य वजन! लहानपणापासून शरीराचा विकास व वाढ होत असतांना उंची व वजन वाढणे हा नैसर्गिक नियम आहे, पण एका विशिष्ट मर्यादेच्या पलीकडे ज्यावेळेस वजन वाढते त्यावेळेस ते नुकसानकारक ठरत असते. यावरून जाडी किंवा लठ्ठपणा ठरत असतो. पण आपण जाड आहोत का नाही हे कसे ओळखावे? व्यक्ती तितक्या प्रकृती प्रमाणेच प्रत्येकाची अंगकाठी व वजन वेगवेगळे असते. त्यामुळे लठ्ठपणा ठरवतांना केवळ वजनाचा निकष लक्षात न घेता आणखीन काही गोष्टींचा विचार करणे आवश्यक असते. यासाठी 'बीएमआय' हा साधारण लोकांना सहजपणे मोजता येईल असा फॉर्मुला उपयोगात आला.

*बीएमआय = वजन / उंचीचा वर्ग उदाहरणार्थ.. ५ फूट ७ इंच (१.७ मीटर) उंचीच्या व ७५ किलो वजनाच्या माणसाचा बीएमआय= ७५/ (१.७)२ = २५.९*

आशिया खंडातील विशेषत: भारतीयांमध्ये बीएमआय २१ हा योग्य मानला जातो. परंतु तो अधिक असल्यास त्या व्यक्तीला स्थूल असे म्हटले जाते. हाच मानक युरोपीय लोकांसाठी ३० असा आहे. याचे कारण भारतीय लोकांमध्ये चरबी मुख्यत: पोटाच्या आसपास अधिक प्रमाणात साठते. पोटाच्या आसपासची चरबी ही जास्त धोकादायक असते कारण ही चरबी शांत न बसता रक्तामध्ये काही टॉक्सिक हार्मोन्स सोडते ज्याला ऍडीपो– सायटोकाईन्स असे म्हणतात. हे ऍडीपो– सायटोकाईन्स स्थूलतेमुळे होणाऱ्या मानसिक व शारीरिक आजारांना आमंत्रण देतात. याउलट युरोपीय वंशातील लोकांमध्ये खांदा व मानेच्या अवतीभवती विसावलेली चरबी ही शांत व निष्क्रिय असल्यामुळे एकूणच कमी धोकादायक असते.

बीएमआयच्या व्यतिरिक्त पोटाचा घेरसुद्धा लठ्ठपणाचा एक चांगला मापदंड म्हंटला जातो. स्त्रियांमध्ये हा ३१ इंच (८० सेमी) वा त्यापेक्षा अधिक तर पुरुषांमध्ये ३५ इंच (९० सेमी) च्या वर असल्यास स्थूलतेत मोडतो. वजनाचे शरीरावर होणारे दुष्परिणाम दोन प्रकारात मोडतात– एक चयापचयाशी संबंधित आजार जसे डायबेटीस, कोलेस्टेरॉल, उच्च–रक्तदाब इ. व दुसया प्रकारातील आजार स्थूलतेमुळे हाडं व स्नायूंचे आजार– पाठदुखीपासून गुडघे दुखीपर्यंत. या दोन्ही धोक्यांमध्ये तुलना केल्यास चयापचयाशी संबंधित आजार हे थोडेही वजन वाढले तरी आपले डोके वर काढतात, तर हाडांच्या व स्नायूंचे आजार वजनातील लक्षणीय वाढीनंतरच होतात. आपल्या शरीराचे वजन वेगवेगळ्या वेळी वेगवेगळे येऊ शकते. त्यामध्ये अक्षरश: किलो–दीड किलोचाही फरक पडू शकतो. त्यामुळे शक्यतो वजन मॉनिटर करतांना एकाच वेळी ऐकाच काट्यावर वजन करावे.

१८ ते २० वयानंतर आपली उंची स्थिरावते व हाडांची वाढ थांबते. त्यामुळे या वयात जे वजन असते (जर ते 'अति' प्रमाणात नसेल तर) ते आपल्या शरिराला सहजपणे पेलवते. सामान्यत: एक समज आहे कि वयाबरोबर वाढणारे वजन हे शरीराला सहजपणे पेलवता येते, पण या वाढणा–या वजनालाही ५ किलोपर्यंतची मर्यादा असते. म्हणजेच तुमच्या अठरा ते विसाव्या वर्षाच्या वजनापेक्षा जर तुमचे वजन ५ किलोपेक्षा अधिक असेल आणि जरी ते उंचीला प्रमाणशीर असेल तरीही ही लठ्ठपणाची सुरवात ठरू शकते. उदाहरणादाखल एखाद्या अतिशय काटक स्त्रीचे अठरा ते विसाव्या वर्षीचे वजन ४५ किलो आहे व दहा वर्षांनतर ते ६० झाले, तर ती लठ्ठपणातच मोडते. तिच्या उंचीनुसार योग्य वाटणारे हे वजन तिच्याकरता धोकादायक असू शकते. त्यामुळे बारीक माणसाने आयुष्यभर बारीकच राहावे व जाड माणसाने आयुष्यभर बारीक होण्याचा प्रयत्न करावा.

डॉ. यशपाल गोगटे, एंडोक्रिनॉलॉजिस्ट (हार्मोन तज्ज्ञ).

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

## ॥ श्री राम कथा ॥




**ज्योतिर्मय साहित्य**

लक्ष्मण म्हणे हे हरिण मायावी वाटते.सीता म्हणे नाही हो. लक्ष्मण म्हणे हरिण कळपात राहते.ते एकटे नसते. इथे अशी हरिणे नाहीत.ते जर चुकून आलेले असेल तर ते घाबरलेले असायला पाहिजे होते.हा तर्क खरे तर पटायला पाहिजे होता. पण स्त्री हट्ट. राम धनुष्य घेऊन निघाले.राम मारीच्याचे मागे लागले त्यांनी बाण मारताच. ठरल्या प्रमाणे मारीच लक्ष्मणा धाव, सीते धाव असे रामाच्या आवाजात ओरडला. रामाच्या आता लक्षात आले हे राक्षसाचे मायावी कृत्य आहे.इकडे सीतेने लक्ष्मणास रामाच्या मदतीला पाठविले. वाल्मीक रामायणात लक्ष्मण रेषा हे लिहिलेले नाही.रावण तपस्वाच्या वेशात सीतेकडे गेला. तिने तपस्वीचे स्वागत केले. रावणाने रामाची निर्भत्सना केली.मग तिला उचलून नेले. जाताना जटायू रावणास आडवा आला.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

सिता अचानक आलेले या प्रसंगाने घाबरले सुटण्याचा प्रयत्न करू लागले पण व्यर्थ सीता शोक करून लागली विलाप करू लागली वृक्षावरील देवतांना.पक्षांच्या आतील देवांना विनंती केली की तुम्ही रामाला सांगा की सीतेला राक्षसाने उचलून नेले आहे.जटायूला रावणाने जखमी केले.

अनुसयेने सीतेला अशी वस्त्र दिली होती की जी कधीच मलिन होत नसत. त्यांनी आभूषणेही दिली होती.

(क्रमशः)

# फुलमाला....



कमळ


मार्च ते सप्टेंबर महिन्यात भरभरून
फुलणारे कमळ हे आपले राष्ट्रीय फूल


चिखलात उगवूनही सुंदर रूपगंधामुळे
सहज पडते याची भूल

लक्ष्मीला प्रिय असलेल्या या फुलाचे बी
जे माळेसाठी होतात उपयोगी

याच्या प्रत्येक भागापासून बनलेल्या
औषध घेतल्याने बरा होतो रोगी..

सौ.माधुरी म.इनामदार, मिरज.





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

## सहजपाठ : रवींद्रनाथांची अनमोल देणगी (२)

बंगालमधील लोक खरंच भाग्यवान ! रवींद्रनाथांचे सहजपाठ जणू त्यांच्या रक्तातच भिनले होते. अगदी शिशुवर्गात जाणाऱ्या लहान मुलांपासून ते वयोवृद्ध असणाऱ्या बंगाली माणसांपर्यंत त्यांच्या सहजपाठातील कविता सर्वांना पाठ होत्या. ही रवींद्रनाथांनी घडवून आणलेली जादू होती. खरंतर शिक्षण क्षेत्रातील ही एक क्रांती होती असे म्हटलेले जास्त योग्य ठरेल.

पु ल देशपांडे यांचा मुक्काम शांतीनिकेतनला असताना त्यांच्यासोबत सलील घोष नामक तेथीलच एक तरुण होता. त्याच्याबरोबर एकता ते शिशुभवनाच्या वस्तीगृहात गेले. त्या प्रसंगाचे मोठे सुंदर वर्णन त्यांनी आपल्या वंगचित्रे या पुस्तकात केले आहे. ते वर्णन अत्यंत हृद्य आहे. तेथे गेल्यावर सलीलने त्यांची तेथे शिकवणाऱ्या बाईंशी ओळख करून दिली. त्या प्रसंगाचे मोठे मनोरंजक वर्णन पुलं करतात. ते त्यांच्याच शब्दात-

''बाईच्या भोवती पाच पंचवीस पोरींचा किलबिलाट चालला होता. आम्हाला पाहिल्यावर उगीचच त्या पोरी लाजल्या काय, गंभीर काय झाल्या, खुदकन हसल्या काय. काही बोलायची सोय नाही. बाईंनी पोरींना काय सांगितले देव जाणे. त्या चिमण्यांचा थवा एकदम माझ्या पायाकडे झुकून प्रोनाम करायला लागला. पुरे पुरे म्हणायला थाक थाक म्हणतात हे तेव्हा मला कळले. मी बाईंना हळूच म्हटले,''या पोरींना सहज पाठातली गाणी म्हणता येत असतील. एक-दोन गाणी म्हणायला सांगाल का ?''

एक दोन ? एकदा सरबत्ती सुरू झाली की आवरणे मुश्किल होईल. आणि खरोखरच जी सरबत्ती सुरू झाली ती संपेचना. एकतर बंगाली म्हणजे ओ ची भाषा. त्या चिमण्या ओठांचे चंबू झाले. एकापाठोपाठ एक अशी गाणी सुरू झाली. सलीलही बालपणी हीच गाणी शिकलेला. त्यानेही आवाज मिसळला. मधूनच तो एखादी ओळ विसरला की पोरींच्या आनंदाला उधाण ! बंगालीत कविता पाठ म्हणण्याला आवृत्ती म्हणतात. एका मागून एक आवृत्त्या निघतच होत्या. त्यात ह्या पूजेच्या सुट्टीची वेळ आल्याबरोबर त्या पोरींनी त्या ओळी म्हणताना पूजेच्या सुट्टीच्या नुसत्या कल्पनेने इतक्या जोरात त्या ओळी म्हटल्या की भिंतीवरची हरणे देखील घाबरून धावत सुटतील असे मला वाटले.

पूजार फुलेर बने ओठे ओई. पूजार रोबी.

(पूजेच्या फुलांच्या वनी उगवला. पूजेच्या दिनींचा रवी...)

पुलं पुढे म्हणतात, बंगाल्यांचा कधीही वाटला नव्हता इतका हेवा मला त्यादिवशी वाटला. पुढे एका चांगल्या प्रौढ स्त्री-पुरुषांच्या मेळाव्यात मी सहज या बालगीतांचा उल्लेख केला. आणि गंमत अशी की त्या रात्री भोजनासाठी जमलेल्या निरनिराळ्या कुटुंबातील स्त्री-पुरुषांनी ती गाणी कोरसमध्ये म्हणायला सुरुवात केली. तोवर माझीही ती गाणी पाठ झाली होती. त्यामुळे त्यांच्या जोडीने मीही माझा आवाज मिसळला.

(क्रमशः)

ऑनलाईन औषधोपचार



आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

# डॉ. निर्मोही फडके यांच्या लेखनातील काळभान

ज्योतिर्मय साहित्य
(मागील अंकावरून)


या काळात या लेखनाच्या पार्श्वभूमीवर आपल्या पूर्वजांनी ठेवलेला काळ समकालीन वास्तवाला जोडत आपल्याला पुढे न्यायचा असतो. त्यासाठीच्या वसंत आबाजी डहाके यांच्या समर्पक ओळी निर्मोहीने सूचकतेने ठेवल्या आहेत. वास्तवाचा विस्तव घेऊन याच काटेरानातून जायचं आहे आणि पुढच्या पिढीच्या हातात तो सोपवायचा आहे, अन्न शिजवायचं की घरं जाळायची याचा निर्णय त्यांनी घ्यायचा आहे.


या सगळ्या मनोभूमीतून आपल्यापुढे वाढून ठेवलेला काळ नव्वदोत्तर पिढीच्या माध्यमातून या लेखनात सगळ्या कार्यकारण भावांना जोडत आपल्यातूनच उगवताना ह्या लेखिकेने पाहिला आहे. त्या काळाचे साहित्यव्यवहारात व जगण्यात प्रतिबिंबित झालेले भान या लेखातून चांगल्या प्रकारे आलेले आहे. हा लेख खरे तर वाचण्यासारखा आहे.
साहित्यात उमटलेल्या प्रतिसादाची त्यात योग्य अशी नोंद आहे.
जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत माणसांचे, त्याच्या संस्कृतींचे झालेले वस्तुकरण, खाजगीकरण व उदारीकरणा ह्यांच्या उठलेल्या पडसादाचा हा काळ आहे. मी त्याला कोसळलेले शतक असे म्हणतो.

१९९० नंतरच्या दोन दशकांमध्ये मराठी साहित्यात शिरलेल्या आधुनिकवाद व उत्तर आधुनिकवाद ह्या प्रवाहाने भाषेच्या स्वरूपात, साहित्याच्या रूपबंधात आणि एकूणच मराठी साहित्याकडे बघण्याच्या मराठी माणसाच्या दृष्टिकोनातच नव्हे तर विचारांच्या बीजांतही बदल केले. हे सगळे झपाट्याने झाले. ते काळाच्या ऐरणीवर स्थिर न राहता सतत बदलत राहिले. चंचलता हा ह्या बदलांचा जणू स्थायीभाव बनला. असे एक निरीक्षण त्यांनी नोंदवले आहे.

आल्विन टाफलरने असे विधान केले आहे की, बदल एवढ्या वेगाने घडतात की, ते जणू आपल्यावर एखाद्या घणाघाती प्रपातासारखे कोसळतात. वेळीच बदलणारे आणि पुढच्या अपरिहार्य बदलांना सज्ज असलेले, या झपाट्यात टिकतील व विकसतील. यापुढे प्रज्ञावंत तोच जो नव्याने शिकेल, शिकलेले विसरून पुन्हा नव्याने शिकेल. असा हा काळ आहे. या काळातील कवींचा, त्यांच्या कवितांचा यथोचित असा लेखाजोखा त्यांच्या वैशिष्ट्यांनी या लेखात मांडलेला आहे.

आता विश्वात्मके डाट काम या लेखात या नव्या पिढीची भाकिते आणि अभिव्यक्तीतील ताणेबाणे त्यांनी कवितांच्या तपशिलांसह विस्तृतपणे समोर ठेवलेले आहेत. याशिवाय आपल्या अवकाशात संस्कृतीत मिसळलेल्या बंगाली भाषेतील लहेजाही त्यांनी गोलाम मुर्शिद यांच्या कवितेच्या माध्यमातून काळाच्या धगधगत्या वाटेवर ठेवला आहे.



- दा.गो. काळे.
(समीक्षक)

रक्तमाखा पथे जन्म तोमार आमि कि भुलिने पारी हा काळ आपला त्याचा सगळ्या विश्वाचाही आहे. याला नाकारता येत नाही.

याशिवाय संतसाहित्यातील परिणामकारकता, त्यांच्या जगण्या- जीवनातून अभंगतेने आलेले तपशील हा आपल्या जगण्यातील महत्त्वाचा ऐवज आहे. नकळत तुकारामाचा अभंग उच्चारल्याशिवाय सामान्य माणसांचे जीवन पुढे सरकत नाही. असे संत मराठी माणसांच्या रक्तामांसात भिनलेले आहेत. त्याचबरोबर मानवतेचा वसा घेऊन आपली कविता लोकमार्गी करणारे विंदा करंदीकर, जीवन मरणाच्या सांद्यावर आपल्या अस्तित्वाचा व नियतीचा खोलवर विचार करणारे आरती प्रभू, बाप ह्या संस्थेची आणि व्यवस्थेची कोसलातून जाणीव करून देऊन, आपल्या सर्वांना झोपेच्या डुलकीत पकडणारे नेमाडे अशा सगळ्यांची नोंद या लेखनात आलेली आहे. मराठी माणसांना आपणच आपल्याला हसते ठेवणारी, कारुण्याची किनार असलेली प्रहसनशील जीवन-जाणीव, आपल्या पूर्वजांसह आजचा वाहता काळ या लेखनाच्या माध्यमातून लेखिकेने पकडला आहे.

या लेखनात आपल्या कवितेच्या अर्थ आणि काळ ह्यांच्या वैशिष्ट्यांसह विंदा करंदीकर व घड्यातील अंतर्नाद या सुंदर लेखाच्या माध्यमातून आरती प्रभू उर्फ चिंतामणी त्र्यंबक खानोलकर हे मराठी साहित्याला लाभलेले एक लखलखीत नक्षत्राचे देणे या संग्रहात आलेले आहे.

'' स्पर्श करतांना अजूनही मी तेवढा शुद्ध नाही एखाद्या बुद्धाच्या जिवणीवरील उदासीन हास्यासारखा....''

अशा ओळी भारतीय संस्कृतीशी, लोकसंस्कृतीशी हरत-हेनं आपली नाळ जोडत जातात, आणि आपल्या संस्कृतीचे काळाचे संकेत या घटितांना पुन्हा पुन्हा जोडले जातात. या त-हेने कलावंत प्रत्येक काळात काही नवे घेत आपल्याला

जोडत नेत असतो. त्या दृष्टीने या कवींनी आपल्यात आपल्याला प्रसवले आहे.

पेशींच्या होडींतून
सुखद संवेदनांची
सोनेरी वल्हीं
हलवीत, हलवीतेते प्रीती

विंदानी म्हटल्याप्रमाणे आपल्या पूर्वजांच्या पेशींतूनच संवेग - संवाद व संवेदनांच्या होड्या प्रेमाचा संदेश घेऊन काळाच्या पटलावर मानवी व्यवहारात प्रवेश करीत येतात, असे या अनुषंगाने मला प्रतीत होते आहे. या सगळ्या विचारप्रवाहांची नोंद नव्या-जुन्याच्या संगमातून अरिंदमच्या लेखांमध्ये उतरली आहे. त्या दृष्टीने

डॉ. निर्मोही फडके लिखित, ग्रंथाली प्रकाशित अरिंदम हा महत्त्वाचा लेखसंग्रह आहे, हे नमूद करायला हवे.

अरिंदम
लेखिका - डॉ. निर्मोही फडके
मुखपृष्ठ - सतीश भावसार
ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.
मूल्य - रू.२००/-

# सत्यभामा चित्रपटाचा उत्कंठावर्धक टिझर प्रदर्शित

ज्योतिर्मय साहित्य

सत्यभामा - अ फरगॉटन सागा या मराठी चित्रपटात रसिकांना आपल्या समाजाच्या भूतकाळातील विचारसरणीचे दर्शन घडविणार आहे. एकोणिसाव्या शतकातील सती प्रथेवर आधारलेला सत्यभामा हा चित्रपट त्या काळातील वास्तव परिस्थितीवर प्रकाश टाकणारा आहे. मुलांवर आई-वडिलांचं असो, वा आई-वडिलांवर मुलांचं, भावावर बहिणचं असो, वा बहिणीवर भावाचं, प्रेयेसीवर प्रियकराचं असो, वा प्रियकरावर प्रेयेसीचं... अपेक्षा न ठेवता केलं जातं तेच खरं प्रेम... अशाच प्रेमाची अनुभूती देणारा सती प्रथेवर आधारित एकोणिसाव्या शतकातील पार्श्वभूमी असलेला सत्यभामा - अ फरगॉटन सागा हा आशयप्रधान चित्रपट आपल्या जवळच्या चित्रपटगृहात ८ ऑगस्टला झळकणार आहे. या चित्रपटाचा उत्कंठावर्धक टिझर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे.




श्री साई सृष्टी फिल्म्स एलएलपी प्रस्तुत सत्यभामा - अ फरगॉटन सागा या चित्रपटाची निर्मिती मनीषा पेखळे, सारंग मनोज, अंकुर सचदेव आणि वीरल दवे यांनी केली आहे. सारंग मनोज आणि अभिजीत झाडगावकर या दिग्दर्शक द्वयींनी सत्यभामाचे दिग्दर्शन केले आहे. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रियांचे झालेले दमन आणि त्या विरोधात रणशिंग फुंकणाऱ्या भावाची कथा या चित्रपटात पाहायला मिळणार असल्याचे संकेत सत्यभामाचा टिझर पाहिल्यावर मिळतात. टिझरच्या सुरुवातीला हिरवा शालू घेऊन नटलेला निसर्ग सम्मोहित करते. धुक्याची पांढरी शाल पांघरून उगवलेल्या रम्य सकाळच्या वेळी नायकाने नायिकेचा हात हातात घेतला आहे. शंकराचे पवित्र मंदिर आणि धाकट्या भावाच्या हातावर राखी बांधणारी बहिणही टिझरमध्ये आहे. या सर्वांची सांगड एकोणिसाव्या शतकातील अमानुष सती प्रथेशी घालण्यात आली असल्याचे टिझर पाहिल्यावर समजते. एक असहाय्य स्त्री समाजाशी एकटी कशी लढू शकेल आणि मला माझ्या जीवनाचे उद्देश सापडले असून, मी सती प्रथेविरोधात लढा देणार, हे संवाद सत्यभामा चित्रपटाचे सार सांगणारे आहेत. या चित्रपटाच्या निमित्ताने पुन्हा एकदा भावा-बहिणीचे अतूट आणि निस्वार्थ नाते अधोरेखित केले जाणार आहे. ९ ऑगस्टला रक्षाबंधन असून, त्याच्या आदल्या दिवशी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. त्यामुळे सत्यभामाच्या रूपात जगभरातील तमाम भावा-बहिणींना एक कलात्मक प्रेमळ भेटच मिळणार असल्याचे दिग्दर्शकांचे म्हणणे आहे. हा चित्रपट केवळ भाऊ-बहिणीच्या नात्याची गोष्ट सांगणारा नसून, समाजातील विविध मुद्द्यांवर प्रकाश टाकत डोळ्यांत अंजन घालणाराही आहे. इतिहासात दडलेली एक जळजळीत सत्य सत्यभामाच्या निमित्ताने रुपेरी पडद्यावर येणार असल्याने प्रेक्षकांनी चित्रपटगृहांमध्ये जाऊन सत्यभामा जरूर पाहावा, असे आवाहन निर्मात्यांनी केले आहे.

सत्यभामाची कथा, पटकथा आणि संवादलेखन मनीषा पेखळे यांनी केले आहे. या चित्रपटात माधव अभ्यंकर, अभिजीत आमकर, भाविका निकम, सृष्टी मालवंडे, ज्योती पाटील, सारंग मनोज, ज्ञानेश्वर शिंदे, मुकुंद कुलकर्णी, दिपाली व योगेश कंठाळे आदी कलाकारांच्या भूमिका आहेत तर ऋषिका सूर्यवंशी, अर्नव शिंदे, लोकेश देवकर, अर्नव तेलंग आदी बालकलाकार ही दिसणार आहेत. या चित्रपटातील गीतरचना मनीषा पेखळे यांनी लिहिल्या असून त्यांना संगीतकार निखिल महामुनी यांनी संगीतसाज चढवला आहे. सिनेमॅटोग्राफी डिओपी जितेंद्र रामचंद्र आचरेकर यांनी, तर संकलन निलेश गावंड यांनी केले आहे. सचिन एच. पाटील यांनी कला दिग्दर्शन केले असून, नरेंद्र पंडीत यांनी कोरिओग्राफी केली आहे. हनी सातमकर यांनी पार्श्वसंगीत दिले असून, सुमीत ओझा यांनी व्हीएफएक्स केले आहेत. नितीन दांडेकर यांनी मेकअप केला असून, शीतल लीना लहू पावसकर यांनी कॉस्च्युम डिझायनिंगसह स्टाईल केली आहे. साहसदृश्ये दिग्दर्शित करण्याचे काम फाईट मास्टर मोहित सैनी यांनी केले आहे. अकबर शेख या चित्रपटाचे प्रोडक्शन कंट्रोलर, तर कुंडलिक कचले कास्टिंग समन्वयक आहेत.



## इंदापूरी निखारे

### काय(दा)



ज्योतिर्मय साहित्य

कोणत्यातरी खेड्यातून अनेक अडचणी वर मात करत अनेक मुले, मुली आसपासच्या शहरात शिक्षण घेण्यासाठी येतात, यशस्वी होतात. शिक्षण झाले की शहरातच नोकरी करायला सुरुवात होते!अनेक प्रसंगातून, घडणाऱ्या घटनांमधून व्यावहारिक जगणे पण शिकत जातात, शहरात रमून जात असतांना स्वप्ने साकारण्याचा काळ सुरु होतो. आणि पारंपरिक पद्धतीने लग्न करून सुखी संसार म्हणजे थोडक्यात सेटल होतात...

अशीच एक ती....

जगण्याच्या धोपट मार्गांवर चालत असणारी! लग्न झाल्यावर १५/१६ वर्षांनी अचानक एक वादळ वैवाहिक जीवनात येते. तिचा नवरा स्वतःच्याच मुलीवर!....

प्रचंड मानसिक धक्का, काय करावे कळत नाही पण एक ठाम निर्णय घेते. पोलीस तक्रार आणि घटस्फोट...

३/४ वर्षांनी निर्णय तिच्या बाजूने...

ती कोर्टाच्या पायऱ्या वरून उतरत असतांना तिच्या देहबोलीतून आनंद ओसंडून वहात होता, या सगळ्या कठीण काळात तिच्या पाठीशी राहून मदत करणाऱ्या मित्रासोबत लग्न केले होते! सगळे कसे पूर्ण कायद्याने, याचा आत्मिक आनंद वेगळाच असतो...

गावात सगळ्या नातेवाईकांना भेटायला आणि दुसरे लग्न पण केले हे सांगण्यासाठी! देवाची पूजा करण्यासाठी पंचायती समोर...

कायदा आहेच आणि परंपरा पण आहेत.कायद्याप्रमाणे त्याचे महत्व किंबहुना त्यापेक्षा जास्तच!

ते सगळे खूप छान केले. तू खूप शिकली स्वतः निर्णय घेऊन एकटी लढली. पंचायती तर्फे तुझे खूप अभिनंदन!पण तू दुसरे लग्न केले त्याला मान्यता दिली नाही, त्याचे विधी करावे लागतील. त्यासाठी ११ लाख रुपये जमा करा तरच मान्यता मिळेल. पंचायत प्रमुख म्हणत होता! नाहीतर तुला आणि तुझ्या सर्व कुटुंबियांना समाजातून बहिष्कृत करून टाकण्यात येईल...

ती पोलीस स्टेशन मध्ये आणि पंचायत प्रमुख, सदस्य पण...

अधिकाऱ्यांना निर्णय घेता येईना. त्यांना १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी एव्हढाच अधिकार...

ती हताश होते, नवऱ्याकडे आशेने पाहते पण एव्हढे पैसे नाही!

जात, धर्म, पंचायत याचे कायदे, परंपरा या मध्ये ती एकटीच!त्याचे रक्षण करणारे आशाळभूत नजरा तिच्या सर्वांगावरून बिनधास्त पणे, त्यांचे डोळे आनंदात अगदी निगरगट्ट.मस्त मांजरीसारखे डोळे मिटून दुध पिण्यासाठी वासनेने...

ती एकटीच असहाय्य...

म्हणे घरची लक्ष्मी, अनेक देवींची रूपे!

कायदा आणि परंपरा याचे रक्षण करण्यासाठी बळी जाण्यासाठी असते का फक्त!

आणि ती बलात्कार झालेली मुलगी?

तो काय प्रश्न आहे का?

ते होतच असतात, होतच राहणार! आपल्या सर्वांचे कर्तव्य म्हणजे कायदा, परंपरा याचे रक्षण प्रथम...

ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ



आठवणीतले बालपण

मित्रांनो, प्रत्येकाच्या आयुष्यात बालपणीचे विशेष महत्व असते, रम्य ते बालपण, खरंच बालपणीसारखी मज्जा परत कधीच येत नाही आता ते दिवस आठवले तरी मन खूप प्रसन्न होतं, तर आपण सर्वजण परत एकदा त्या बालपणीच्या विश्वात जाऊया, त्या आठवणींना एकदा उजाळा देऊयात ज्योतिर्मयच्या माध्यमातून. मग लिहायला सुरुवात करा व पटकन पाठवा मला 7743918559 या व्हाट्सअप नंबरवर
- संजय व्यापारी, संपादक,
ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ.

# ।। सुंदर साजिरा श्रावण आला...।।

ज्योतिर्मय साहित्य

।। श्रावण मासी हर्ष मानसी, हिरवळ दाटे चोहीकडे क्षणात येते सर सर शिरवे,क्षणात फिरुनी उन पडे..।। श्रावण महिन्यात निसर्गाने आपले रूप बदललेले असते. श्रावण सरी कोसळतात. पाऊसही क्षणात येतो क्षणात जातो. सर्वदूर हिरवे गवताचे गालिचे पसरले असतात. म्हणूनच कवितेत वर्णन केले आहे.. हिरवे हिरवे गार गालिचे हरित तृणाच्या मखमलीचे..... श्रावण हा सणांचा राजा मानला जातो. श्रावणातील प्रत्येक दिवसाचे महत्त्व वेगवेगळे आहे. वातावरण भक्तिमय झालेले असते. भक्तिचा सुगंध दरवळत असतो. श्रावणाच्या सुरुवातीला जिवतीचा कागद देवघराजवळ चिकटवून दर शुक्रवारी जिवतीचे पूजन, आरती करायची जुनी परंपरा आपल्याकडे आहे.आपल्या अपत्यांच रक्षण व्हावं ही त्यामागील भावना आहे.

श्रावणात शिवपूजनाला खूप महत्त्व आहे.शक्य होईल तसे जोतिर्लिंगाचे दर्शन घ्यावे. त्र्यंबकेश्वर, घृष्णेश्वर, औंढा नागनाथ, परळी वैजनाथ, भीमाशंकर,या ठिकाणी भाविकांची दर्शनासाठी गर्दी असते. अनेक ठिकाणी, मंदिरात, किंवा घरी, रुद्रपाठ करतात. श्रावणी सोमवार, मंगळागौर, जिवतीची पूजा, नृसिंह पूजन,जन्माष्टमी, (गोकुळाष्टमी) राखी पौर्णिमा, नारळीपौर्णिमा, बैल पोळा, या प्रमाणे श्रावणात सण-उत्सवही मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. नवविवाहित स्त्रियांनी श्रावणातील प्रत्येक मंगळवारी करावयाचे सौभाग्यदायी मंगळागौरी ह्या देवतेचे एक व्रत. या व्रतात शिव आणि गणपतीसह गौरीची पूजा करतात. लग्नानंतर पहिली पाच वर्षे किंवा सात वर्षे हे व्रत पाळल्यानंतर या व्रताचे उद्यापन करतात. सुवासिनी स्त्री श्रावणातल्या मंगळवारी आपल्या विवाहित मैत्रिणींसह शिवासमवेत असलेल्या गौरीची पूजा करतात. पहिल्या वर्षी माहेरी हे व्रत विवाहितमैत्रिणी एकत्र जमून मंगळागौर रात्रभर जागवितात. निरनिराळे खेळ, गाणी, उखाणे इत्यादींनी मजेत दिवस व रात्र घालवितात व दुसरे दिवशी पहाटे पूजा-आरती करून सांगता करतात. 'जय जय मंगळगौरी' म्हणून सोळा वातींची मंगल आरती भक्तिभावाने करतात. मंगळागौरीची कहाणी ऐकतात. पाच अथवा सात वर्षे व्रते केल्यावर उद्यापन करतात.

''नागपंचमी'' हा श्रावण महिन्यातील सण आहे.या दिवशी घरोघरी नागाची पूजा करून नागदेवतेला प्रसन्न करण्याची पद्धत आहे. कालिया नागाचा पराभव करून यमुना नदीच्या पात्रातून भगवान श्रीकृष्ण सुरक्षित वर आले तो दिवस श्रावण शुद्ध पंचमीचा होता. त्या दिवसापासून नागपूजा प्रचारात आली असे मानले जाते.

एका शेतकऱ्याच्या नांगराच्या फाळाने नागिणीची तीन पिल्ले मृत्युमुखी पडली व त्यामुळे नागदेवतेचा कोप झाला अशीही समजूत प्रचलित आहे. त्यामुळे या दिवशी शेतकरी आपल्या शेतात नांगरत नाही. कोणीही खणत नाही, घरी कोणीही भाज्या चिरायच्या नाही, तवा वापरायचा नाही व कुटायचे नाही असे काही नियम पालन करण्याची प्रथा आहे. श्रद्धाळू माणसे नागदेवतेची पूजा करून तिला दूध-लाह्यांचा व गव्हाच्या खिरीचा नैवेद्य दाखवतात व आपले संरक्षण कर अशी प्रार्थना करतात.

अनंत (म्हणजेच शेष), वासुकी, पद्मनाभ, कम्बल, शंखपाल, धृतराष्ट्र, तक्षक आणि कालिया या आठ नागांची या दिवशी पूजा केली जाते.

नागपंचमीच्या दिवशी नागाची पूजा करताना महिला पाटावर किंवा भिंतीवर नागाचे चित्र काढतात.

पेठ नाका (इस्लामपूर)पासून उजव्या बाजूला एक फाटा फुटतो. तेथून साधारण २० कि.मी वर बत्तीस शिराळा गाव आहे. सांगली जिल्हातील हा निसर्गसमृद्ध भाग आहे. बत्तीस शिराळ्यापासून जवळच चांदोली अभयारण्य, चांदोली धरण आहेत.

नागपंचमीच्या दिवशी शिराळा गावात ग्रामदेवतेची पूजा करून साधारणपणे १००-१२५ नागांची एकाच वेळी मिरवणूक काढली जाई. त्यानंतर नागाचे खेळ आयोजित

शिराळ्याची नागपंचमी पूर्वी देशातच नव्हे तर परदेशांतही प्रसिद्ध होती. नागपंचमीसाठी पूर्वी लाखो लोक जमायचे. परंतु, सापांचे होणारे हाल पाहून येथील निसर्ग व वन्यजीवप्रेमींनी थेट मुंबई हायकोर्टात धाव घेतली. कोर्टाने वन्य जीव संरक्षण कायद्यानुसार २००२ मध्ये आदेशा मुळे

काही वर्षांपासून बत्तीस शिराळ्यात फक्त प्रतीकात्मक मिरवणूक काढली जाते.

हिंदू पंचांगाप्रमाणे श्रावणात येणारी ''राखी पौर्णिमा'' ही नारळी पौर्णिमेच्या दिवशी किंवा पौर्णिमा लागोपाठ दोन दिवस असेल तर दुसऱ्या दिवशी असणाऱ्या पौर्णिमेला साजरी करतात. याच दिवसालारक्षाबंधन म्हणतात. या दिवशी रक्षाबंधनाचा कार्यक्रम असतो.हा सण बहीण भावाच्या अतूट, उत्कट प्रेमाची आठवण करून देणारा दिवस आहे. श्रावण पोर्णिमेस राखी बांधावी, उत्कर्ष व्हावा, आपल्या भावाने आपले रक्षण करावे, ही यामागची मंगल मनोकामना असते.

''नारळी पौर्णिमा'' हा सण समुद्रकाठी राहणाऱ्या व प्रामुख्याने मासेमारी करणाऱ्या




मुख्य कोळी लोकांचा सण आहे. पावसाळ्यात समुद्र प्रचंड खवळलेला असतो. बोटी जहाजांची वर्दळ या काळात बंद असते. समुद्राचा कोप होऊ नये, जहाजे, नौका सुरक्षित रहाव्यात, समुद्र शांत होण्यासाठी कोळी लोक समुद्राला नारळ अर्पण करतात. महाराष्ट्राला ७२० किलोमीटर लांबीचा अखंड समुद्रकिनारा लाभलेला आहे. या ठिकाणी राहणाऱ्या कोळी लोकांचे उपजीविकेचे प्रमुख साधन किंवा व्यवसाय हा मासेमारी आहे. ते लोक श्रावणी पौर्णिमेला नारळी पौर्णिमा असे म्हणतात.

नारळी पौर्णिमेच्या काही दिवस अगोदर कोळी बांधवांनी समुद्रात जाणे बंद केलं असते.

पावसाळ्यात समुद्रामध्ये मासेमारीसाठी उतरणारे कोळी लोकांना समुद्रापासून धोका असतो. त्यामुळे श्रावणी पौर्णिमेनंतर पावसाचा जोर थोडा कमी झालेला असतो. समुद्र हे वरून देवतेच्या वास्तव्याचे ठिकाण मानले जाते. समुद्राची कृपा कोळी लोकांवर रहावी. म्हणून रीतसर पूजा करून वाजत-गाजत सोन्याचा नारळ अर्पण करतात..

''गोकुळाष्टमी'' हा श्रावण महिन्यात येणारा सर्व बालगोपाळांचा आणि गोविंदांचा आवडीचा सण आहे. कृष्ण जन्माच्या या दिवसाला श्रीकृष्ण जयंती, दहीहंडी, श्रीकृष्ण जन्माष्टमी असेही म्हणतात. या दिवशी भगवान श्रीकृष्णांचा जन्म मोठ्या उत्साहात आणि आनंदात संपूर्ण भारतात साजरा केला जातो. श्रीकृष्णाचा जन्म श्रावण वद्य अष्टमीस मध्यरात्री, रोहिणी नक्षत्रावर चंद्र वृषभ राशीत असताना झाला. म्हणूनच या दिवशी गौळणींचा लाडका कान्हा श्रीकृष्ण याचा जन्मोत्सव साजरा करण्याची प्रथा आहे.

कृष्ण हे भगवान विष्णूचे आठवे अवतार आहेत असे पुराणात वर्णन आहे. तसेच भगवान श्रीकृष्ण हे वासुदेव आणि देवकीचे आठवे पुत्र होते. यादिवशी बरेचजण गोकुळाष्टमीचा उपवास करतात. सगळीकडेच यादिवशी लहान मुलांपासून ते मोठ्या माणसांपर्यंत सर्वचजण 'आला रे आला गोविंदा आला' असा जयघोष करत असतात. दहीहांड़ी म्हटलं की, आपल्या सर्वांच्याच डोळ्यासमोर दिसतात त्या उंचच उंच दहीहंड्या आणि ती फोडण्यासाठी उभे असणारे गोविंदा.

भगवान श्रीकृष्णांना दही, दूध, लोणी हे पदार्थ खूप आवडत असे. श्रीकृष्ण हे चोरून दही खात असे त्यामुळेच कृष्णाला माखन चोर असेही म्हणतात. दही,दूध, लोणी आणि लाह्या हे सगळे एकत्र करून बनवलेला पदार्थ म्हणजे काला. श्रीकृष्ण गायी चरताना स्वतःची व सवंगड्यांची शिदोरी एकत्र करून ते सर्व खाद्यपदार्थ एकत्र करून त्याचा काला करत असे आणि आपल्या सवंगड्यांसह खात असे. या कथेला अनुसरून गोकुळाष्टमीच्या दुसऱ्या दिवशी गोपाळकाला साजरा करतात. गोपाळकाल्याच्या दिवशी दही, दूध, लोणी आणि लाह्या, पोहे, दाणे, लोणचे, मीठ, यांचा काला ''गोपाळकाला करून प्रसाद म्हणून सर्वांना वाटतात.तसेच पंजिरी- (धनापावडर, गुळ, खोबर, सुंठ, खडीसाखर.)



यांच दिवशी दही दुधाने भरलेली हंडी उंच बांधून ही दहीहंडी सर्व गोविंदा एकत्र येऊन फोडतात. आपल्या या भारतीय संस्कृतीमध्ये गोकुळाष्टमीला एक अनन्यसाधारण महत्व आहे. वृंदावन, मथुरा, गोकुळ, द्वारका या ठिकाणी तर हा सण खूप मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. कारण याच ठिकाणी भगवान श्रीकृष्णांचे जन्मस्थान असल्यामुळे तिथे मोठ्या उत्साहात गोकुळाष्टमी साजरी होते.

हिंदू लोक श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या दिवशी उपवास करतात. यादिवशी श्रीकृष्णाची पूजा करतात, रात्री उशिरापर्यंत जागतात आणि श्रीकृष्ण जन्माच्या वेळेला रात्री १२ वाजता प्रार्थना, पूजा करतात. कृष्णाच्या लहानपणीचा फोटो किंवा मूर्ती पाळण्यात ठेवतात.


आत्ताच्या या आधुनिक आणि तंत्रज्ञानप्रिय जगात गोकुळाष्टमी साजरी करताना, दहीहंडी जास्त उंच न बांधता, खाली बांधून तिचा आनंद घ्यावा.जर उंच बांधली असेल तर संरक्षणासाठी उपाययोजना कराव्यात आणि मगच या दहीहंडी फोडण्याच्या स्पर्धा आयोजित कराव्यात. कारण दरवर्षी बऱ्याच गोविंदांना यामध्ये आपला जीव गमवावा लागतो.नाचगाण्याचे बीभत्स कार्यक्रमास स्थान नसावे.

पोळा किंवा बैलपोळा हा श्रावण अमावस्येला बैलाची कृतज्ञता व्यक्त करणारा हा एक मराठी सण असून हा विशेषतः विदर्भात, खांदेशात, भव्य पातळीवर साजरा केला जातो, ज्यांच्याकडे शेती नाही ते मातीच्या बैलाची पूजा करतात. नागपंचमी, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, गोकुळाष्टमी या सणांबरोबरच सरत्या श्रावणात पिठोरी अमावस्येला संपूर्ण महाराष्ट्रात साजरा केला जातो असा सर्जा-राजाचा सण म्हणजे 'पोळा. ज्या दिवशी बैलांकडून कुठलेही कामकाज केले जात नाही त्याच्या मानेवर जू ठेवली जात नाही.पुरणपोळीचा नैवेद्य केला जातो. असा हा व्रत वैकल्याचा सणांचा, आनंददायी, उत्सवाचा आणि उत्साहाचा श्रावण मासाचे २५ जुलै रोजी आगमन होत आहे.

# द लेसबियन - स्वातंत्र्याची बंडखोर कलाकृती

ज्योतिर्मय साहित्य

मराठी कादंबरी नव्या अनुभूती व नव्या जाणिवेने समृद्ध करण्यासाठी अनेक लेखकांची धडपड चालू आहे, नवे प्रयोगही सिद्ध केले जात आहेत. त्यातील द लेसबियन कादंबरी हा सर्वार्थाने नवा, यशस्वी झालेला कलात्मक प्रयोग आहे. शुभांगी दळवी यांच्या लेखणीतून ही कलात्मक साहित्यकृती जन्माला आली आहे. लैंगिक साक्षरतेला परंपरागत विरोध करून विकृती, अज्ञान व समज गैरसमज जपणाऱ्या भारतीय समाजात नैसर्गिक आनंदाला पारखे राहण्याची वृत्ती कायम आहे. संस्कृतीचा ध्येयवाद सर्वांच्या सर्व सुखाचा असला तरी संस्कृतीच्याच कैवार्यांचा मुळात त्यास आजही कट्टर विरोध आहे; असे काहीसे संघर्षात्मक चित्र आणि चरित्र आपल्या वाट्याला आले आहे. प्राचीन काळापासून कामशास्त्राचा अभ्यास वात्स्यायनाच्या वास्तववादी ज्ञानदृष्टीने समाजाला पुरवला आहे. स्त्री-पुरुष संभोगाची व समलिंगी संबंधांची साक्ष पौराणिक काळातही कायम आहे.







द लेसबियन कादंबरीत मानसी व कल्याणी दोन्ही स्त्रिया आहेत, म्हणून त्या नायिका. मग नायक कोण? त्यांच्यापैकीच एक नायक मानता येईल का? खलनायक मात्र शशांक आणि अमनला मानता येईल, कारण अमनकडून कल्याणीला धोका मिळालाय आणि लग्नानंतर कल्याणीवर अन्याय केलाय त्यामुळे नवरा म्हणून शशांक सर्वार्थाने कुचकामी असूनही तो पुरुषी अहंकारात बुडालेला आहे. स्त्री वेदना व त्यातून मुक्ती तसेच मानवी रूपात असणाऱ्या स्त्रीचे लैंगिक आनंदही नैसर्गिक असतील तर ते अधिकार सुरक्षित रहावेत हा मुळ हेतू शुभांगी दळवी यांचा आहे. स्त्रीची अनेक रूपे व तिच्या अनेक समस्यांना या कादंबरीत लेखिकेने बोलके केले. स्त्री अत्याचाराच्या अनेक कथांना इथे शब्द रूप मिळाले आहे. खरे तर मानसीची सासू परंपरा वादी न दाखवता ती उदारमतवादी असल्याचे शुभांगी दळवी दाखवतात. स्त्रीचे पुरोगामी व्यक्तीमत्व वाचकांनाही भावते. सासूच विधवा सुनेचे पुन्हा लग्न लावण्याचा प्रयत्न करते पण मानसी तयार नसते. यामध्ये समंजस आणि मित्रत्वाच्या नात्याला समर्थपणे न्याय देऊ पाहत असणारे चिन्मय आणि केतकी हे जोडपे ही आले आहे. तसेच दुष्ट प्रवृत्तीचे लोकही समाजात असतात परंतू लेखिकेची दृष्टी सम्यक आहे. दोन्ही प्रवृत्तीच्या स्त्री-पुरुष व्यक्तिरेखा त्यांनी कादंबरीत शब्दबद्ध केल्या आहेत. विशेषता वाईट प्रवृत्तीच्या बायकांचे बोलके चित्र कादंबरीच्या कथानकात आले आहे. पण प्रत्यक्षात अशी विकृत स्त्री व्यक्तिरेखा दाखवलेली नाही. शशांक आणि अमनच्या रूपाने वाईट पुरुषांचे प्रतिनिधित्व कथानकाच्या गाभ्यात आहे. अशी विकृत वाईट स्त्री कादंबरीत का नसावी? समाजात अशा स्त्रिया जरूर आहेत पण कादंबरीत स्त्री अत्याचार व स्त्री वेदना या संबंधानेच आलेली असल्यामुळे शुभांगी दळवी यांना नव्या प्रश्नाच्या संबंधाने मंथन जरुरी वाटल्याचे दिसते. त्यामुळेच त्यांनी अशा व्यक्तिरेखांची निवड केलेली आढळते.

सत्प्रवृत्त पण वेदना भोगणारी गोल्डन आँटी जशी त्यांनी उभी केली तशीच सत्प्रवृत्त विधवा मानसीच्या आयुष्यातील पेच कादंबरीत मांडला आहे. स्वतःच्या नैसर्गिक उर्मीचा सन्मान करणारी बिनधास्त कल्याणी श्रीयंत रूपात उभी केली आहे. मानसीच्या मनात समलिंगी संबंधांबद्दल द्वंद्व आहे. तिच्या अंतर्मनातल्या विविध भावना व संकल्पनांच्या संघर्षाचे वर्णन लेखिकेने केले आहे. त्यामुळे तिच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा, वाचक मनावर प्रभावीरित्या उमटणारा आहे. मानसिक संघर्ष हा अंतरंगी वास्तवाचा शोध असतो त्यामुळे ती व्यक्तिरेखा संवादातून जशी उलगडते तशीच ती मानस पातळीवरील चिंतनातून सुद्धा अधिक प्रभावीरीत्या उलगडते. मानसी काही प्रमाणात सुधारणावादी आणि पुरोगामी आहे. तिचे स्वतःचे अस्तित्व अर्थपूर्ण करण्याच्या संदर्भात ती जागरूक आहे. सामाजिक समाजातील बायकांनी तिला व कल्याणीला ताळतंत्र सुटलेल्या व बिघडलेल्या बायका ठरवले असले तरी त्या परंपरावादी जोखडातून मुक्त आहेत. पण तरीही काही संदर्भ तिच्या भूमिकेला परंपरावादी वर्तुळातच अनुभवण्यासाठी कारण ठरतात. दुसऱ्या लग्नाचा विचार करताना तिला अनुराग म्हणजे तिच्या मुलाच्या अस्तित्वाचे भान आहे. हा काही तिचा परंपरा वाद नव्हे पण कल्याणीच्या संदर्भात लेसबियन म्हणून जगताना तिला लोक काय म्हणतील हा विचार येतो. शिवाय अनुरागला काय वाटेल हा विचार सुद्धा तिला मुक्तपणे जगू देत नाही. हा तिच्या मनातील पेच अत्यंत महत्त्वाचा आहे. तो व्यक्त न करता समलिंगी संबंधांचे चित्रण लेखिकेने केले असते तर ती वरवरची कलाकृती ठरली असती.

(क्रमशः)

# प्रेमाची सहजसुंदर गोष्ट- लाईफ इन अ मेट्रो

ज्योतिर्मय साहित्य

**तब्बल १८ वर्षांनंतर, जेव्हा लाईफ इन अ मेट्रोचा सिक्वेल पडद्यावर आला आहे, तेव्हा वाट पाहण्याचे सार्थक वाटते. हा चित्रपट पाहताना, अनुराग बसू यांनी अतिशय सुबकपणे विणलेल्या कडू आणि गोड भावनांनी तुम्ही भरून जाल. नीना गुप्ता आणि अनुपम खेर त्यांच्या भूमिकांमध्ये खूप मजबूत दिसले. न सुटलेल्या नातेसंबंधांची न सुटलेली कहाणी म्हणजेच लाईफ इन अ मेट्रो.....**




प्रसिद्ध दिग्दर्शक अनुराग बसू यांच्या २००७ सालच्या लाइफ इन अ मेट्रो या चित्रपटात मेट्रो शहरांमधील वेगवेगळ्या वयोगटातील लोकांची कहाणी दाखवण्यात आली होती. त्यात खऱ्या प्रेमाचा शोध, दीर्घ विवाहित जीवनात पती-पत्नीच्या नात्यात वाढणारे अंतर, विवाहबाह्य संबंध, नात्यांमधील बेवफाई, पतीची चूक माफ करणे आणि दुसरी संधी देणे यासारखे मुद्दे मांडण्यात आले होते. संगीत हा त्यात महत्त्वाचा भाग होता. जवळजवळ १८ वर्षांनंतर, अनुराग बसू मेट्रोमध्ये परतले आहेत.मेट्रो... इन दिनों हा अनुराग बसू यांचा भावनिक, संगितप्रधान चित्रपट आहे, जो वेगवेगळ्या शहरांतील आणि वयोगटांतील प्रेमकथांना एका कथानकात गुंफतो. पंकज त्रिपाठी व कोंकणा सेन शर्मा यांच्या जोडीतला विवाहबाह्य संवाद, सारा अली खान व आदित्य रॉय कपूर यांची द्विधा अवस्था, नीना गुप्ता-अनुपम खेर यांचं जुनं प्रेम, आणि फातिमा सना शेख-अली फजल यांचं करिअर आणि प्रेमातील द्वंद्व हे सर्व दाखवण्यात आलं आहे. पात्रं खूप मानवी आहेत, संवाद आणि संगीत प्रभावी आहे, तर काही ठिकाणी गती मंदावते. संपूर्ण चित्रपट प्रेम आणि नात्यांची गुंतागुंत सुंदरपणे उलगडतो. डिजिटल युगात प्रेमाबद्दल बदलणारा दृष्टिकोन आणि अतिरेकी माहितीचा आजकाल नातेसंबंधांवर कसा परिणाम झाला आहे अशा समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला आहे.




या चित्रपटातून यावेळी, मुंबई व्यतिरिक्त, दिल्ली, बंगळुरू, कोलकाता आणि पुणे यासारख्या इतर महानगरांचाही शोध घेण्यात आला आहे. जरी त्याचा सिक्वेल म्हणून प्रचार करण्यात आला नसला तरी, तो आपल्याला मूळ चित्रपटाची आठवण करून देतो. यावेळी पात्रांची संख्या वाढली आहे आणि चित्रपटाचा कालावधीही वाढला आहे.

पात्रांद्वारे शोधलेले वेगवेगळे पैलू ही कथा कोलकातामध्ये राहणाऱ्या शिवानी (नीना गुप्ता) आणि संजीव (शाश्वत चॅटर्जी) यांच्या दोन मुली आणि त्यांच्याशी संबंधित लोकांभोवती फिरते. मोठी मुलगी काजोल (कोंकणा सेन शर्मा) हिचे तिच्या पती मान्ती (पंकज त्रिपाठी) सोबत १९ वर्षांपासून लग्न झाले आहे. बाहेरून त्यांचे आयुष्य परिपूर्ण दिसते पण तसे नाही. त्यांच्या १५ वर्षांच्या मुलीची स्वतःची द्विधा मनस्थिती आहे. काजोलची धाकटी बहीण चुमकी (सारा अली खान) एचआर कन्सल्टंट आहे पण ती आज्ञाधारक स्वभावाची आहे. ये-जा करताना तिचा मध्यमवयीन प्रभाव तिला इकडे तिकडे स्पर्श करतो. रागावला तरी ती ते सहन करते. चुमकी तिच्या सहकाऱ्यावर प्रेम करते आणि लवकरच त्या दोघीही लग्न करणार आहेत.

एका नाट्यमय वळणावर, तिची भेट ट्रॅव्हल ब्लॉगर पार्थ (आदित्य रॉय कपूर) शी होते. ते मित्र बनतात. निश्चिंत पार्थचा मित्र आकाश (अली फजल) संगीतकार बनू इच्छितो, परंतु श्रुती (फातिमा सना शेख) सोबतच्या लग्नामुळे आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे त्याची स्वप्ने मागे पडली आहेत. दुसरीकडे, शिवानीचीही लग्नापूर्वी स्वप्ने होती, परंतु ती कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे दडपली गेली.

(क्रमशः)

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559